# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/सा.प्र.वि./ ४२८/2020-21
सामान्य प्रशासन विभाग
दि.२५ /11/2020

उपायुक्त (मु.)
९६२४
दिनांक २५/११/२०२०

**कार्यालयीन आदेश**

**विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन 2020**
**समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करणेबाबत.**

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे. त्याअनुषंगाने विधानमंडळ कामकाजाशी संबंधित प्राप्त तारांकित प्रश्न/लक्षवेधी सूचना/औचित्याचे मुद्दे/कपात सुचना इत्यादी ई-मेलव्दारे प्राप्त् होतात. या विधानमंडळ आयुधांव्दारे उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे/माहिती विहीत कालमर्यादेत देणे अपेक्षित आहे.

सबब, महाराष्ट्र विधानमंडळ कामकाजाचे समन्वयन करण्याकरिता महानगरपालिका स्तरावर श्री. अजित मुठे, उपायुक्त (मु.) यांची "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

श्री. अजित मुठे यांनी संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांचेशी समन्वय साधून विधानमंडळात उपस्थित प्रश्नांची परिपुर्ण/मुद्देसुद उत्तरे/माहिती विहीत कालमर्यादेत शासनास पाठविण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

तसेच सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी शासनास माहिती दिल्यानंतर त्यांची पोच उपायुक्त (मु.) यांना माहितीस्तव उपलब्ध करुन द्यावी.

सर्व विभागप्रमुखांना सुचित करावे. आस्थापना
२६/११

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) **श्री. अजित मुठे,** उपायुक्त (मु.)
2) सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख
3) स्थळ प्रत

**प्रत माहितीकरिता**

अवर सचिव, नगर विकास विभाग (नवि-28)